क्र. पो.म.सं /४४/नियोजन /Best Practices/०८/२०१५, मुंबई, दि. १९/०७/२०१८

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-२०१८ (Best Practices - Next Practices २०१७-२०१८)

******

उपरोक्त विषयास अनुसरून, घटक कार्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील आयुक्तालये, जिल्हे व विशेष घटक त्यांच्या कार्यक्षेत्रातील समस्यांचा अभ्यास, तंत्रज्ञानाचा उपयोग व नाविन्यपूर्ण पध्दतींचा वापर करून सुरक्षितता ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशाप्रकारे उदयास आलेल्या, नाविन्यपूर्ण योजनांचा लाभ इतरांना देखील होणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्रातील ५ विशेष घटक, ३ आयुक्तालये, ३ परीक्षेत्रीय कार्यालये व ४ जिल्हे अशा एकुण १५ घटकांनी अमलात आणलेल्या योजना व त्यामुळे झालेले सकारात्मक बदल यांची माहीती संकलित करण्यात आली आहे. सदर घटकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील इतर घटकांना देखील सदर माहीतीचा फायदा व्हावा याकरीता **"उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-१८"** ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

सदर पुस्तिकेची **mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर **Flash** व **Positive Stories** शीर्षाखाली जोडण्यात आलेल्या पीडीएफ फाईल चा वापर करुन आपल्या कार्यालयीन संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.

20/7/18


**( डॉ.प्रज्ञा सरवदे )**
अपर पोलीस महासंचालक (तरतुद)
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रति,
सर्व पोलीस घटक कार्यालये.

# महाराष्ट्र पोलीस उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-१८

## महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# महाराष्ट्र पोलीस उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-१८



## पोलीस महासंचालकांचा संदेश

वाढती लोकसंख्या, शहरीकरण, समाजकारण, राजकारण व तंत्रज्ञनाचा वापर यांच्यात प्रचंड बदल झाल्यामुळे गुन्हेगारी देखील वाढली आहे. वाढती गुन्हेगारी, बदलती गुन्हे पध्दती व गुन्हयांचे प्रकार यांना सामोरे जाऊ‍न सक्षमपणे कायदा व सुव्यवस्था राखता यावी याकरिता महाराष्ट्र पोलीसांच्या कामातदेखील अमुलाग्र बदल होत आहेत.

मला सांगण्यास अभिमान आहे की, महाराष्ट्रातील आयुक्तालये, जिल्हे व विशेष घटक त्यांच्या कार्यक्षेत्रातील समस्यांचा अभ्यास, तंत्रज्ञानाचा उपयोग व नाविन्यपूर्ण पध्दतींचा वापर करून सुरक्षितता ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशाप्रकारे उदयास आलेल्या, नाविन्यपूर्ण योजनांचा लाभ इतरांना देखील होणे आवश्यक आहे. याकरिता महाराष्ट्रातील ५ विशेष घटक, ३ आयुक्तालये, ३ परिक्षेत्रीय कार्यालये व ४ जिल्हे अशा एकुण १५ घटकांनी अमलात आणलेल्या योजना व त्यामुळे झालेले सकारात्मक बदल यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. सदरची माहिती पोलीस अनुसंधान व विकास संस्थेला देशात वाटण्याकरिता देण्यात आली आहे. सदर घटकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील इतर घटकांना देखील सदर माहितीचा फायदा व्हावा याकरीता ***"उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-१८"*** ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

काळानूरूप चालण्यासाठी नाविन्यपूर्ण पध्दतींचा वापर करून पोलीसांची सक्षमता वाढविल्याबद्यल मी, सदर १५ घटकांचे मन:पूर्वक कौतूक करतो. तसेच पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या प्रकल्प सुधारणा कक्षाने सदरच्या योजना पुस्तिकारूपात संकलित करण्याची विशेष कामगिरी केली आहे व अशाप्रकारे पोलीस नियोजनात मोलाचे काम करीत रहावे. त्याच प्रमाणे यापुढेदेखील महाराष्ट्र पोलीसातील सर्व घटकांनी नवनवीन उपाययोजना राबवाव्यात व अशा योजनांची सुयोग्य अंमलबजावणी करावी याकरीता हार्दिक शुभेच्छा.

***"उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७-१८" ही पुस्तिका मालिका रूपात दरवर्षी प्रसारीत करण्यात येईल.***

**दत्ता पडसलगीकर**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अनुक्रमाणिका


१. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक ........ ९
२. प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई ........ १०
३. लोहमार्ग पोलीस, पुणे ........ ११
४. राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई ........ १२
५. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई ........ १३
६. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय ........ १५
७. ठाणे पोलीस आयुक्तालय ........ १७
८. नाशिक पोलीस आयुक्तालय ........ १९
९. नाशिक परिक्षेत्र ........ २०
१०. औरगांबाद परिक्षेत्र ........ २१
११. गडचिरोली जिल्हा पोलीस ........ २२
१२. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस ........ २३
१३. यवतमाळ जिल्हा पोलीस ........ २४
१४. भंडारा जिल्हा पोलीस ........ २५
१५. जळगांव जिल्हा पोलीस ........ २६

## १. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

**विषय:** प्रशिक्षण व्यवस्थापन प्रणाली तयार करणे.

**योजनेचा उद्देश:** नवप्रविष्ठ व सेवाअंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी याची कार्यक्षमती वाढविण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण देवून त्याची शारिरीक, मानसिक क्षमता व त्याच्या कामात व्यवसायिकता वाढविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यानी काळानुरुप प्रशिक्षणामध्ये बदल केला असून learning management system, virtual class rooms इत्यादी पध्दतींचा करण्यात येतो. जेणे करून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणीच online प्रशिक्षण घेणे शक्य हाते.

- सध्या वेब कास्टींग प्रशिक्षण समाविष्ट करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये You Tube या सोशाल मिडीया ॲपव्दारे तज्ञ व्यक्तीचे मुद्रीत केलेले तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शकपर व्याख्यान थेट प्रसारित केल्याने महाराष्ट्रातील सर्व पोलीस अधिकांऱ्यांपर्यंत पोहचण्यास मदत झाली आहे.
- महाराष्ट्र पोलीस दलामध्ये २,२१,००० मनुष्य संख्याबळ असून त्यातील पोलीस उप निरीक्षक व त्यावरील दर्जाचे १६ हजार अधिकारी आहेत. एकढया मोठया संख्येने असलेल्या अधिकांऱ्यांपर्यत पोहचण्यासाठी **"वास्तविक मार्ग"** (Virtual Way) या लर्निग मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर करण्यात आला यामुळे जास्तीत जास्त अधिकांऱ्यांपर्यत तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन पोहचण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील मोठया संख्येने असणाऱ्या अधिकांऱ्यांपर्यत पोहचण्यासाठी **"वास्तविक मार्ग"** (Virtual Way) या लर्निग मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर करण्यात आला आहे. **"वास्तविक मार्ग"** प्रशिक्षणाने सर्व जगातील प्रगतशील देशातील पर्यावरण अंतर्गत व्यवस्था बदलून टाकली आहे याचा प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शक प्रशिक्षण देण्यासाठी उपयोग होत आहे.
- दिनांक ०८.१२.२०१५ रोजी महाराष्ट्र सरकारने E-Acadamy ची स्थापना केली आहे. E-Acadamy मुळे महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकांऱ्यांमध्ये वास्तविक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार झाले असून तज्ञाच्या ज्ञानाचा लाभ सर्व अधिकारी यांना होत आहे. याकरिता संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी हे अंमलबजावणी करणारे अधिकारी असतील. महाराष्ट्र पोलीस अकादमी चे संचालक हे विविध प्रकारच्या टिम उदा. घटक आढावा, घटक उत्पादन प्रक्रिया सादरीकरण व व्यवस्थापन तयार करतील.
- महाराष्ट्र पोलीस अकादमी संकेतस्थळावर एकुण विषय संख्या १७१ असून अतिथी व्याख्याताचे २२८ प्रसारित करण्यात आले असून एकुण वापरकर्ते १२,७३८ असून त्याचे ४४,३४० तास झाले आहेत.

## २. प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**योजनेचा उद्देश:** भावनिक प्रज्ञा प्रशिक्षणाव्दारे पोलीस अधिकारी आणि कर्मचांऱ्याच्या विचार व कामामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

प्रशिक्षण संचालनालयाने मे. पार एक्सीलन्स या मानवी संसाधन संस्थेच्या मार्फतीने महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना भावनिक प्रज्ञा या विषयावर अभ्यासक्रम तयार केला आहे. तसेच ५३ पोलीस अधिकाऱ्यांना TOT म्हणुन प्रशिक्षित करण्यात आले आहे. TOT प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस प्रशिक्षकांनी महाराष्ट्र पोलीस अकादमी व पोलीस प्रशिक्षण केंद्रातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. त्याच प्रमाणे भावनिक प्रज्ञा हा विषय महाराष्ट्र पोलीस अकादमी व सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रांमधील अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

भावनिक प्रज्ञा हे अत्यंत कठीण असे मृदु कौशल्यपूर्ण काम आहे. भावनिक प्रज्ञा या प्रशिक्षणातून स्वत:च्या भावना ओळखणे, स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेवणे, इतरांच्या भावना ओळखणे आणि त्यातुन भावनिक प्रज्ञावंत पोलीस कसा असावा याचे प्रशिक्षण देवून पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या विचार व कामामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे हा उद्येशाप्रमाणे सदर प्रशिक्षणचा ३ दिवसाच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम बनविण्यात आला आहे.

आत्ता पर्यंत ७२२ अधिकारी व ४०७७ अंमलदार अशा एकुण ४,७९९ यांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांचे कौशल्य व क्षमता वाढण्यास मदत झाली खालीलप्रमाणे सकारात्क बदल दिसून येत आहेत.

- सकारात्मक व विधायक विचाराने कामकाज केल्याने कठीण, आव्हानात्मक, संघर्षमय व आक्रमक परिस्थितीत रागावर संयम ठेवल्याने पोलीसी कामकाजात बदल घडून येणे शक्य झाले आहे. तसेच भावनिक प्रज्ञा प्रशिक्षणामुळे अधिकारी यांनी आपल्यामधील जाास्तीत जास्त ऊ र्जा चांगल्या कामगिरीसाठी वापर करुन कर्तव्याचे ध्येय साध्य केले आहे.
- खाजगी आयुष्यात भावनिक प्रज्ञा प्रशिक्षणामुळे परस्पर संबंध सुधारुन कामाचे व खाजगी आयुष्य सुधारण्यास मदत झाली आहे.
- कामाच्या ठिकाणी चांगली वातावरण निर्मिती केल्याने कमी ताणतणाव कमी होवून आयुष्य सुखी व समाधानकारक होण्यास मदत झाली आहे.

## ३. लोहमार्ग पोलीस, पुणे

**योजनेचा उददेश**: रेल्वे प्रवशांच्या जिवताचे व मालमत्तेचे सरंक्षण करण्यासाठी कार्यक्षमता वाढवणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम**:

लोहमार्ग पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- पुणे रेल्वे अंतर्गत संवेदनशिल व दरोडाग्रस्त विभागातील गंभीर प्रकारच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी व रेल्वे प्रवाशामध्ये सुरक्षेची तसेच भयमुक्त वातावरणात प्रवास करण्याची भावना निर्माण करण्यासाठी पुणे रेल्वे पोलीसाकडून लांब पल्याच्या एकुण १९ गाडयांवर रात्रीच्या वेळी ४ शस्त्रधारी पोलीसांची गस्तीसाठी नेमणूक करण्यात येते. उदा. पुणे ते सोलापूर, पुणे ते मिरज, पूणे ते अहमदनगर इ. कर्तव्यावरील पोलीसांनी प्रवाशांना लोखंडी खिडक्या बंद करण्याच्या सूचना दिल्याने तसेच स्टेशन येताच एखादा संशयीत प्रवासी बॅग घेवून उतरतो किंवा चढतो यावर लक्ष ठेवल्याने, दरोडा तसेच गाडयातील प्रवाशांच्या सामानाचे चोरीचे प्रमाणात घट झालेली दिसून येत आहे. या गस्ती पथकास वेगवेगळया स्थानकावर अधिकारी तपासून त्याचा अहवाल सादर करत असल्याने कर्मचारी गैरहजर तसेच मध्येच गाडी सोडण्याच्या प्रकारांना आळा बसला आहे. दरोडाग्रस्त भागातील ठिकाणाचा अभ्यास व यापूर्वीच्या दरोडयाचा पूर्व इतिहास तपासून तेथे शस्त्रधारी पोलीसांची नेमणूक करण्यात आल्याने दरोडा घालून ठराविक ठिकाणावरुन पळून जाण्याचे प्रमाणात घट झाली आहे.
- प्रभावित प्रशासन व्यवस्थेमुळे सार्वत्रिक बदल्यांमध्ये अधिकारी व कर्मचारी यांना जाण्या येण्यास सोयीचे जवळचे पोलीस ठाणे देण्यात आल्याने बदलीमुळे होणारी गैरसोय व त्या अनुषंगाने गैरहजेरीचे व आजरी पडण्याचे प्रमाणात घट झाली असून जास्तीत जास्त मनुष्यबळ कर्तव्याकरिता उपलब्ध होत आहे.
- आर ट्रॅक ॲप या योजनानेमुळे अडचणीत व दुघर्टनाग्रस्त प्रवाशांना पोलीसांची तात्काळ मदत उपलब्ध झाल्याने रेल्वे अपघातात जखमी झालेल्या प्रवांशाचे प्राण वाचण्यास मदत झाली आहे. तसेच रेल रोको, आंदोलनाच्या वेळी आर ट्रॅक योजनेमुळे जास्तीत जास्त मनुष्यबळ घटनास्थळ पाठविण्यास मदत झाली आहे.

# ४. राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**योजनेचा उद्देश:** स्वच्छ भारत अभियान संकल्पना राबवून याकरिता एक गाव दत्तक घेणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

राज्य राखीव पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेशी सुसंवाद वाढविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- स्वच्छता अभियानामुळे रा.रा.पो.बलाच्या घटकांचा परिसर स्वच्छ होण्यास मदत झाली असून प्लास्टिक मुक्त अभियानामुळे दैनदिन वापरामध्ये प्लास्टिकच्या वस्तू ऐवजी नष्ट होणाऱ्या वस्तू वापरण्यावर जनजागृती केल्याने प्लास्टिकच्या वस्तूचा वापर कमी करण्यास प्रवृत्त झाले आहेत.
- जनसामान्यात इंधन म्हणून लाकडाचा वापर कमी करुन पर्यायी इंधनाचा वापर करण्याबाबत प्रबोधन केल्याने इंधनासाठी झाडाची होणारी बेसुमार कत्तल थांबली आहे.
- रा.रा.पो.बलाच्या १६ गटांनी १६ गावे दत्तक घेतली असून प्रत्येक गावात पोलीस भरती मार्गदर्शक शिबीर, शासकीय योजनांची माहिती, पाणलोट क्षेत्र बांधणी, आरोग्य शिबीर, रोख विरहीत व्यवहार बाबत मार्गदर्शन केल्याने नागरिकांना सरकारी योजनेचा फायदा घेण्यास सुरवात केली असून त्यामुळे त्याच्या जीवनस्तर उंचावण्यास मदत झाल्याचे दिसून येत आहे.
- रा.रा.पो.बलाच्या गटातील पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये कर्तव्य बाबत जबाबदारीची जाणीव व्हावी, त्यांचे व्यवसायिक कौशल्यात सुधारणा व्हावी याकरिता कर्मचाऱ्यांची जुनी वार्षिक शेरे नोंद पध्दती बदलून स्पर्धात्मक पध्दतीने वार्षिक शेरे नोंदणी घेणे तसेच पोलीस अधिकारी याची गुणवत्ता वाढावी म्हणुन आदर्श पोलीस अधिकारी स्पर्धा आयोजित करुन आदर्श पोलीस अधिकाऱ्यांना सन्मानित केल्याने त्याच्यात निकोप स्पर्धा होवून त्याच्यातील गुणवत्ता व कौशल्यात वाढ झाली आहे.

## ५. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

**योजनेचा उद्देश:** भष्ट्राचाराबाबत जागृती, प्रतिबंध व निमुर्लन करणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

लाचेच्या स्वरुपात घेतलेल्या पैशाचे रुपांतर काळया पैशामध्ये नंतर चलनवाढीमध्ये होते. लाचलुचपत प्रतिबधंक विभाग हे सरकारी, निमसरकारी, अनुदानित महामंडळे, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या भष्ट्राचाराच्या आरोपीची चौकशी व कारवाई करण्याचे काम करते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन भ्रष्टाचारास प्रतिबंध व्हावा नागरिकांची कामे लाच न देता विनाविलंब व्हावी, त्यांना आर्थिक भुर्दंड होवू नये, भष्ट्राचार मुक्त कामकाज यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

**१. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्षमीकरण व कार्यक्षम करण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते.**

- लाचलुचपत प्रतिबंध येथे कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचारी यांना कायदेशीर व तांत्रिक सल्ला देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याने व त्यात विविध क्षेत्रातील तज्ञाची समावेशाने तसेच महाराष्ट्र ज्युडीशियल ॲकडमी मार्फत लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अंमलबजावणीबाबत कायदेशीर व तांत्रिक प्रशिक्षण दिल्याने अधिकारी व कर्मचारी यांना विविध विषयातील खाचखळग्याची व वारंवार होणाऱ्या चुका यांची माहिती होवून त्याची पुनरावृत्तती टाळून कामात व्यवसायिकता व अचुकता वाढून कार्यक्षमतेमध्ये फरक पडलेला दिसून आला आहे. विविध प्रकारच्या कार्यशाळा, कायदेशीर बाबीवर चर्चा व सल्ला यामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम दाखल होणाऱ्या केसेसवर झाला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत दाखल असलेल्या वेगवेगळया प्रकारच्या केसेसचे सादरीकरण व तपासातील महत्वाचे दाखले तपास अधिकारी यांना प्रसारित केल्याने तपासातील त्रुटी दुर होण्यास मदत झाली आहे. अधिकारी यांना वेगवेगळया यंत्रणेकडून प्रशिक्षण दिल्याने त्याच्यातील तपासातील, सापळे रचण्याच्या कौशल्यामध्ये वाढ झाली असून पुराव्याअभावी अथवा इतर तांत्रिक कारणावरुन आरोपीत इसम सुटण्याच्या प्रमाणात फरक पडलेला दिसून येत आहे. सी. बी. आय. मार्फत विषम संपत्तीबाबत (Disproportionate of Assets) तपासाचे प्रशिक्षण दिल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या कौशल्यात वाढ झाली असून या प्रकरणात विभागातील अधिकारी यांनी जास्तीत जास्त विषम संपत्ती उघड केली आहे.
- लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा केसेस मध्ये इनबिल्ट संभाषणाची नोंद ठेवणारे उपकरणाचा (Digital Voice Recorder) वापर केल्याने आरोपीत इसमाने खरोखरीच तक्रारदार यांच्याकडे

लाचेची मागणी केली आहे किंवा कसे याबाबत पडताळणी (Verification) होते. या उपकरणाने नोंद केलेले संभाषण योग्य त्या कायदेशीर प्रक्रिया करुन मा. न्यायालयात पुरावा म्हणून सादर केल्याने मा. न्यायालयाने सदरचे संभाषण ग्राहय धरुन आरोपीत इसमास दोषी ठरवून त्यास शिक्षा देण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तक्रारदार व आरोपीत इसम यांचे संभाषणाच्या उताऱ्याचे रुपांतर केल्याने मागितलेल्या लाचेची कारणे व लाचेबाबत निश्चित माहिती मिळण्यास मदत झाली आहे.

**२.** आधुनिक तांत्रिक सामाजिक प्रसार माध्यमांचा वापर भष्ट्राचार रोखण्यासाठी सामान्य जनतेस प्रोत्साहित करुन त्याच्यापर्यत पोहचण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुन सोशल मिडीयावर जनतेची वाढती उपस्थिती लक्षात घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खालील विविध व नवीन साधनाचा वापर केला जातो.

- भष्ट्राचार रोखण्यासाठी सामान्य नागरिकांस प्रोत्साहित करुन त्याच्यापर्यत पोहचण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप, http://facebook.com/maharashtraACB हे फेसबुक पेज, व्टिटर हॅन्डल, (९९३०९९७७००) वॉटसअॅप नंबर, (१०६४) हा टोल फ्री नंबर, www.acbmaharashtra.gov.in ही वेबसाईट इ. चा वाढता वापर करत आहे. यामुळे भष्ट्राचाराबाबत माहिती मिळून नागरिकाच्या भष्ट्राचारासंबंधी तक्रारीचे तात्काळ निरसण होण्यास मदत झाली आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून सामान्य नागरिकापर्यत पोहचून त्याच्यात भष्ट्राचाराबाबत जागरुकता निर्माण करत असून भष्ट्राचार निपटून काढण्यासाठी नागरिक प्रोत्साहित करण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यशस्वी झाला आहे. सोशल मिडीयावरुन नागरिकांनी केलेल्या मत प्रदर्शन, चर्चा व टिकेमुळे कामाचा दर्जा व त्यातील त्रुटी सुधारण्यास मदत झाली आहे. टोल फ्री नंबर उपलब्ध करुन दिल्याने दुरच्या भागात राहणा-या व विभागाकडे तात्काळ पोहचू न शकणाऱ्या जनतेची मोठी सोय झाली आहे. भष्ट्राचारा विरुध्दची लढाई अधिक तीव्र करण्यासाठी सामान्य जनतेपर्यत विभागातील अधिकारी व अंमलदार स्वत:हून पोहचण्याच्या उपक्रमामुळे भष्ट्राचार करणाऱ्या मनात धडकी भरली असून या विभागाच्या धाकामुळे व प्रबोधनामुळे सरकारी कामकाजात सकारात्मक बदल दिसून आला आहे.

## ६. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय

**योजनेचा उद्देश:** विविध यंत्रणांच्या एकत्रीकरण व सुसुत्रीकरणाद्वारे पोलीसांची कार्यक्षमता वाढविणे व जनतेला अधिक चांगल्याप्रकारे व कमी कालावधीत दर्जेदार सेवा पुरविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम**: नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिका व CIDCO ही दोन मुख्य प्राधिकरणे समाविष्ट आहेत. त्यांच्याशी समन्वयाने CCTV यंत्रणा राबविण्यात आली आहे.

**परीमंडळ १/ नवी मुंबई महानगरपालिका:** १४ मे २०१३ पासून ६८ ठिकाणी २८ PTZ व २५१ FIX असे एकुण २७९ IP CCTV कॅमेरे व मुख्यालयात कमांड सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहेत. सदर सेंटर मध्ये बिनतारी संच, दुरध्वनी सेवा, Dial १००, Traffic helpline, website तसेच प्रतिसाद व citizen cop apps चे कामकाज हाताळण्यात येते. सदर सेंटरद्वारे विविध पोलीस ठाणे व शाखांना ८७७ CCTV footage देण्यात आले असून त्याच्या मदतीने २०१ गुन्हे उघडकीस येण्यास मदत झाला आहे. त्याचप्रमाणे ऑगस्ट २०१४ पासून evidenced based e challan प्रणालीद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरू केले आहे. आत्ता पर्यंत १०,२७७ केसेस द्वारे ६,७४,१२४ इतका दंड आकारण्यात आला आहे.

**परीमंडळ २/ CIDCO:** ८ ऑगस्ट २०१६ पासून १३० ठिकाणी १३ PTZ व २८१ FIX असे एकुण २९४ CCTV कॅमेरे व बेलापूर रेल्वे स्थानक दुसरा मजला येथे कमांड सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहेत. सदर सेंटर मध्ये बिनतारी संच, दुरध्वनी सेवा, Dial १०० चे कामकाज हाताळण्यात येते. सदर सेंटरद्वारे २८४ गुन्हयांच्या तपासकामी मदत झाली आहे. तसेच महाराष्ट्रात प्रथमच CCTNS व CCTV यंत्रणांचे Integration करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे खालील नमूद Smart City Components देखील कार्यान्वित करण्यात आले आहेत.

१) **Automatic Number Plate Recognition (ANPR):** १२ ठिकाणी ANPR कॅमेरा बसविण्यात आले आहेत. CCTNS यंत्रणेतील महाराष्ट्रातील ६,९८६ वाहन चोरीचा डेटा CCTV कमांड सेंटरसोबत Integrat करण्यात आलेला आहे. हा डेटा सीसीटीव्ही कमांड सेंटर येथील ANPR व Speeding Counter यंत्रणेच्या संगणक प्रणालीसोबत जुळविला जातो. जर चोरीचे वाहन ANPR अथवा Speeding Counter कॅमेऱ्याच्या कक्षेतून गेले तर त्वरित CCTV कमांड सेंटर येथील यंत्रणेला Real Time Basis वर Alert दिला जातो. आदर्श कार्यप्रणालीनुसार CCTV कमांड सेंटर त्वरित सदरची माहिती नियत्रंण कक्ष, बीट मार्शल व पोलीस स्टेशनला योग्य ती कार्यवाहीसाठी देण्यात येते.

२) **Face Recognition:** CCTNS यंत्रणेतील २०१५ पासून महाराष्ट्रात हरविलेल्या १,२०० व्यक्तींचा डेटा CCTV कमांड सेंटरसोबत Integrate करण्यात आलेला आहे. हा डेटा Excel Sheet मध्ये Share Folder मध्ये सीसीटीव्ही कमांड सेंटरला देण्यात आला आहे. ANPR कमेऱ्यांच्या कक्षेत हरविलेल्या व्यक्ती आल्यास CCTV यंत्रणा Face Reconition या Software च्या मदतीने संग्रहीत हरविलेल्या

व्यक्तींच्या फोटोंची CCTV मधील फुटेजशी जुळवणी करुन तपासणी करते. CCTV कमांड सेंटर सदरची माहिती नियत्रंण कक्ष, बीट मार्शल व पोलीस स्टेशनला योग्य त्या कार्यवाहीसाठी देते.

३) **Emergency Call Box (ECB) :** एकुण ०६ ठिकाणी Emergency Call Box बसविण्यात आले असून, नागरिकांना अडचणीचे वेळी Switch Press करुन सेंटरला कॉल देऊन माहिती देता येते.

४) **Variable Messging Sign (VMS) :** एकुण ०४ ठिकाणी VMS (LED Screen) उभारण्यात आले असुन, त्याद्वारे जनजागृती संदर्भातील विविध संदेश प्रदर्शित केले जातात.

५) **Public Address System (P.A.System) :** एकुण १२ ठिकाणी P.A. System उभारण्यात आल्या असून कमांड सेंटर येथुन System उभारलेल्या ठिकाणी नागरिकांना परिस्थितीनुरुप महत्त्वाच्या सूचना उद्घोषित करण्यात येतात.

६) **E-Challan :** १७ जून २०१७ पासून Evidence Based ई-चलन प्रणालीद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर २,४५७ केसेस करण्यात आल्या व त्याद्वारे रुपये ८,४८,५३६/- इतका दंड वसूल करण्यात आला.

७) **Collaborative Monitoring :** एकुण १८ महात्त्वाच्या विविध खासगी आस्थापनांचे (मंदिर, मस्जिद, स्टेडियम, हॉस्पिटल, बस-डेपो, ONGC, Port, इ.) एकुण १०३ सीसीटीव्ही कॅमेरे कमांड सेंटरशी जोडण्यात आलेले आहेत.

८) **Dail १०० Integration:** नियंत्रण कक्षातील Dail १०० यंत्रणा CCTV कंमाड सेंटरसोबत Integrate करण्यात आलेली आहे.

९) **Automatic Speeding Vehicles Alert:** अति वेगाने वाहन चालविणाऱ्या वाहन चालकाविरुध्द कारवाई करणेकामी एकुण ०६ Speeding कॅमेरे उभारण्यात आले असून, ताशी ८० कि.मी. पेक्षा जास्त वेगाने जाणाऱ्या वाहनांबाबत कमांड सेंटर येथे Alret येतो व वाहन चालकावर कारवाई होते.

१०) **Sound Intelligence Indication :** अचानक एखादा मोठा आवाज झाल्यास उदा.(Firing, Accident, Blast, etc.) कमांड सेंटर येथे Alert येतो व त्याप्रमाणे मदतीसाठी आवश्यक कार्यवाही घेण्यात येते.

CCTV कमांड सेंटरच्या कार्यक्षमतेसाठी खालील विषयांवर एकुण १० Standing Operating Procedures (SoPs) तयार केल्या आहेत.

१) Gang War,
२) Murder,
३) Riot/Stone pelting/ Damaging Public Property/ Desecration of religious place or statues,
४) Chain snatching/ Bag lifting/Dacoit/ Vehicle theft/ theft/ kidnapping,
५) Accident (Quarrel and traffic jam),
६) Accident only quarrel,
७) Accident (Hit & Run)
८) Accident (petroleum vehicle slipped),
९) Accident vehicle caught fire,
१०) Accident (Casualty/ Fatal)

## ७. ठाणे पोलीस आयुक्तालय

**योजनेचा उद्देश:** गुन्हयांना आळा घालण्यासाठी गुन्हेगार दत्तक योजना

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम**:

ठाणे आयुक्तालयातील पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- **गुन्हेगार दत्तक योजनेमध्ये** पोलीस ठाणे नेमणूकीतील प्रत्येक कर्मचाऱ्यास शरीराविरुध्द गुन्हे व मालमत्ता चोरी गुन्हयांमध्ये अटक झालेल्या आरोपींचे वाटप करण्यात येते. सदर कर्मचारी त्यांच्या पॉकेट डायरीमध्ये वाटप केलेल्या आरोपीबाबत इत्यंभुत माहितीची नोंद ठेवली जाते. तसेच वाटप केलेल्या आरोपीच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून किमान आठवडयातून एकदा आरोपीच्या घरी अचानक भेट देऊन त्याच्या हालचाली व सद्य उदरनिर्वाहाच्या साधनाबाबत चौकशी केली जाते व सदर आरोपी घरी मिळून न आल्यास त्याच्या नातेवाईकांबरोबर समन्वय साधण्यात येता व त्याच्या हालचालीची चौकशी करण्यात येते. पोलीसांच्या या उपक्रमामुळे आरोपीत इसमास पोलीसांचे आपल्या हालचालीवर लक्ष आहे अशी मनोमनी खात्री होवून त्याच्या गुन्हेगारी कारवायावर निर्बध येवून आरोपीच्या वृत्तीमध्ये सकारात्मक बदल दिसून आला आहे. पोलीसांनी आरोपीच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याच्या कामात नागरिकांची मदत घेतल्याने पोलीसांचा जनसंपर्क वाढून नागरिकामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होवून अन्यायाबाबत नागरिक स्वत:हून पोलीस ठाण्यास येवून तक्रारी नोंद करु लागले आहेत.
- **पोलीस पाल्यांकरिता नोकरी सेंटर तयार करणे:** पोलीस पाल्यांना नोकरी / रोजगार मिळवून देणे हा या योजनेचा उद्‌देश आहे. पोलीस आयुक्त ठाणे पोलीस आयुक्तालयाने दि.२५ नोव्हेंबर २०१६ रोजी नोकरी सेंटरची स्थापना केली असून यामध्ये उत्साही व सकारात्मक दुष्टीकोन असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आली आहे. अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नोकरी सेंटरीची माहिती व्हावी म्हणुन पोलीस पत्रकामध्ये नोंकरी सेंटरचा पत्ता व पोलीस पाल्यांना नोकरी बाबतच्या संधी याविषयी माहिती प्रसारित करुन प्रसिध्दी देण्यात आल्याने रोजगाराच्या शोधात असलेल्या पोलीस पाल्यांना उपलब्ध नोकरी व रोजगार संधीची मिळाली आहे.
  - पोलीस पाल्यांनी प्रत्यक्ष नोकरी सेंटर संपर्क केला असता नियुक्तीवरील अधिकारी व कर्मचारी पोलीस पाल्याना परिपुर्ण माहिती देवून शिक्षणानुसार पात्र पदानुसार त्यांचे शैक्षणिक बायोडाटा सेंटर मध्ये जमा केले आहेत.
  - पोलीस पाल्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातुन वेळोवेळी पोलीस पाल्यांचे समुपदेशन, संभाषण, मुलाखत कौशल्य, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, कौशल्य विकास प्रशिक्षण, नेतृत्व गुण विकास,

इंपोर्ट-एक्सपोर्ट मॅनेजमेंट, हयूमन रिसोर्स मॅनेजमेंट, वैयक्तिक मॉक इंटरव्यु प्रशिक्षण, प्रत्यक्ष मुलाखत संधी, व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शन इत्यादी विषयावर संबधित तज्ञांमार्फत कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पोलीस पाल्यांना नोकरी व रोजगाराच्या स्पर्धात्मक जगाची माहिती होवून पूर्व तयारी करुन घेतल्याने ते इतरांच्या तुलनेत नोकरीस पात्र ठरत आहेत.

- मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरातील नामांकित कंपन्या/बँका यांच्याशी संपर्क करुन नोकरी सेंटर या पोलीस पाल्यांच्या कल्याणकारी उपक्रमाबाबत माहिती देण्यात आली असून त्यांच्याकडे कोणत्या प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत व त्याकरीता लागणारी शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेबाबत माहिती घेवून नोंदणी केलेल्या पाल्यास त्याची माहिती घेवून त्याची पूर्व तयारी करुन तेथे पाठविले जाते.
- पोलीस पाल्यांना रोजगाराक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातुन संबंधित तज्ञांमार्फत आयोजित केलेल्या कार्यशाळेचा ७५० पेक्षा अधिक पोलीस पाल्यांनी लाभ घेतला. दि.०४/०३/२०१७ व १६/१२/२०१७ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करुन त्यामध्ये अंदाजे ७००० पेक्षा पोलीस पाल्यांने सहभाग नोंदवला होता. नोकरी सेंटरच्या माध्यमातून १५७० पोलीस पाल्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत.
- राज्यातील पोलीस विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे आपल्या व्यस्त कामकाजामधून आपल्या पाल्यांच्या शिक्षण व त्यानंतर नोकरी याकडे वेळ देता येत नाही यामुळे त्याच्यात एक प्रकारचे नैराश्य आले होते परंतू नोकरी सेंटरच्या माध्यमातून त्याच्या मुलाना नोकरी व रोजगाराविषयी योग्य मार्गदर्शन केल्याने त्याना स्पर्धात्मक युगात टिकून नोकरीची संधी मिळाल्याने पोलीसाची आर्थिक बाजू भक्कम झाल्याने एक प्रकारचे मानसिक स्थैर्य मिळाल्याने जास्त उत्साहाने काम करू लागले आहेत.

## ८. नाशिक पोलीस आयुक्तालय

**योजनेचा उद्देश:** जनजागृती कार्यक्रम राबविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

नाशिक शहर पोलीसांनी जनतेमध्ये गुन्हयाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी खालील प्रमाणे जनजागृती योजना राबविल्या आहेत.

- नाशिक शहरातील कॉलेजमधील प्रशिक्षित मुलाचीं निवड करुन यांच्या मार्फतीने शाळा व महाविद्यालयांमध्ये **सायबर जागरुकता** कार्यक्रमामुळे जनतेमध्ये सायबर गुन्हयाबाबत जागरुकता निर्माण होवून पोलीसांकडे संपर्क करण्याची जागरुकता नागरिका मध्ये आली आहे.
- महिलामध्ये सुरक्षितेची भावना निर्माण व्हावी याकरिता **"मीच माझी रक्षक", "आदिशक्ती जागर स्त्री शक्तीचा" व "पुन्हा घरी"** हया कार्यक्रमामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ व अन्यायाविरुध्द दाद मागण्याची जागरुकता आली आहे. तसेच "पुन्हा घरी" हया कार्यक्रमाचे आयोजनामुळे छोटया छोटया कारणावरुन मतभेद व गैरसमज होवून नवऱ्यापासून वेगळे राहणाऱ्या महिलाची घर वापसी होण्यास मदत झाली आहे.
- मॅरेथॉन शर्यतीत "रन फॉर ट्राफिक" कार्यक्रमाचे आयोजन केल्याने जनतेमध्ये वाहतुकीचे नियम व साधने वापरण्याबाबत जागरुकता निर्माण झाली आहे. आवाजामुळे होणारे प्रदुषण टाळण्यासाठी नो हॉर्न डे ही संकल्पना यशस्वीरित्या राबविल्याने नाशिक शहरातील आवाज प्रदुषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली असून परिक्षार्थी, वृध्द व आजारी यांना यामुळे दिलासा मिळाला आहे.
- सर्वधर्म गुरु याची जातिय सलोखा राखण्यासाठी मॅरेथॉन शर्यतीच्या वेळी रॅली कार्यक्रमाचे आयोजन सर्वधर्म गुरु यांची मॅरेथॉनमधील रॅलीमुळे दोन जमातीमध्ये व्देषाची भावना व तेढ कमी होवून जातिय सलोखा राखण्यास मदत झाली आहे.
- विविध गुन्हयात चोरटयाकडून हस्तगत मुद्देमाल फिर्यादीस स्वत:हून परत करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याने पोलीसांचे चांगले काम जनतेच्या नजरेस येवून जनतेचा पोलीसांवरील विश्वास वाढला असून पोलीस व नागरिक यांच्यातील सुसंवादात वाढ झाली आहे. तसेच पोलीस ठाण्यातील अभिलेखावरील मुद्देमाल संख्या कमी होण्यास मदत होवून जागेची अडचण काही प्रमाणत दुर झाली आहे.

## ९. नाशिक परिक्षेत्र

**योजनेचा उद्देश:** पोलीसांची कार्यक्षमता वाढवणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन नागरिकांना जलद व सुयोग्य सेवा देण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- परिणामकारक व वेगवेगळया भाषेतील अधिक माहिती पुरवणारे वेबसाईट विकसित केली. नागरिकांना तक्रारी व मार्गदर्शनासाठी सोशल मिडीयाचे विविध ॲप उपलब्ध करुन देवून त्याचा परिणामकारक व प्रभावी वापर केला. फेसबुक पेज, ट्विटर हॅन्डल, वॉटसॲप, टोल फ्री नंबर, वेबसाईट नागरिकांसाठी तक्रारी व मार्गदर्शनासाठी उपलब्ध करुन दिल्याने दुर राहणाऱ्या नागरिकांचा पोलीस ठाण्यास येण्या जाण्याचा त्रास कमी होवून वेळेची बचत झाली आहे.
- राष्ट्रीय महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी महामार्गावरील अपघात ग्रस्त ठिकाणे, अपघाताची वेळ व अपघात होण्याची कारणे शोधून आवश्यक त्या ठिकाणी योग्य संख्यात्मक मनुष्यबळाची नेमणूक करुन तेथे वाहन चालकांना मार्गदर्शक सूचना फलक लावून अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना केल्याने अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे.
- अभ्यांगत यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वागत कक्ष उभारुन तेथे जनसंपर्क अधिकारी यांची नेमणूक करुन कामाचा आढावा घेतल्याने अधिकारी व अंमलदार यांच्या कामात व्यवसायिकपणा येवून पोलीसांची जनमानसात प्रतिमा उजळ होण्यास मदत झाली आहे.
- नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीची दखल घेणे याकरिता प्रलोभन व कठोर शिक्षा (Carrot and Stick Policy) असे धोरण ठेवण्यात आले. पोलीस ठाणे व पोलीस अधिक्षक कार्यालय येथे कामानिमित्त येणाऱ्या अर्जदार व तक्रारदार यांना सौजन्याची वागणूक देवून तक्रार घेण्यास टाळाटाळ न केल्याने व तात्काळ दखल घेतल्याने नागरिकाचे पोलीसाविरुध्द तक्रारीचे प्रमाण कमी झालेले दिसून येत आहे.
- नाशिक परिक्षेत्रातील मोटार परिवहन कायद्यार्गत कारवाई, पाहिजे फरारी आरोपी अटक, प्रलंबित केसेसची पूर्तता, मुद्देमालाचे परत, समन्स वॉरंट बजावणी, इ. करिता विशेष कार्यक्रम आयोजित करुन उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या अधिकारी, अंमलदार यांचे अभिनंदन व बक्षीस देवून प्रोत्साहित केल्याने अधिकारी व अंमलदार यांच्या काम करण्याच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत झाली आहे.
- अधिकारी व कर्मचारी यांना वेगवेगळे विषय, उद्दिष्ठे बाबत सेवाअंतर्गत तज्ञाकडून प्रशिक्षण दिल्याने अधिकाऱ्याचे तपासातील कौशल्य, दर्जा वाढण्यास मदत झाली आहे. वरिष्ठ अधिकारी यांनी पोलीस ठाणे अथवा शाखा भेटीच्या वेळी तपासणी करण्यास जास्त वेळ दिल्याने पोलीस ठाणे व शाखा यांच्या कामात वक्तशिरपणा आला आहे.

## १०. औरगांबाद परिक्षेत्र

**योजनेचा उद्देश**: पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला सेवा पुरविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

औरगांबाद परिक्षेत्रातील पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- **आय बाईक** रचना अंतर्गत घटनास्थळावरील गुन्हेगाराचे जमा केलेले पुराव्याचे योग्य व न्याय वैज्ञानिक दृष्टीने जतन करणे व ओळखणे याकरिता आय बाईक औरगांबाद परिक्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे. आय बाईक वरील तज्ञ हे सायन्स पदवीधर व न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा यांनी प्रशिक्षित केलेले आहेत. गुन्हयाच्या अथवा घटनेची खबर मिळताच आय बाईक प्रथम घटनास्थळी जाते.
  आय बाईक वरील कर्मचारी गुन्हयाच्या घटनास्थळावरुन पुरावे ओळखून, ते जमा करुन जागेवर जतन करण्याची प्रक्रिया करतात. आय बाईक वरील कर्मचारी गुन्हयाच्या घटनास्थळाची तसेच साक्षीदार यांची फोटो व व्हिडिओ ग्राफी करुन जतन करतात.याकरिता त्यांना विशेष तपासी प्रशिक्षित प्रशिक्षकाची मदत मिळते.
  आय बाईक रचनेमुळे गुन्हयाच्या घटनास्थळी आय बाईक प्रथम पोहचल्याने घटनास्थळ सुरक्षित राहण्यास मदत होते. न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेचे तज्ञाची मदत मिळाल्याने पुरावे ओळखून पुराव्याचे योग्य व न्याय वैज्ञानिक दृष्टीने घटनास्थळीच जतन केल्याने न्यायालयात गुन्हे शाबीतीचे प्रमाण वाढून गुन्हेगारास शिक्षा होण्याचे प्रमाणात वाढ होण्यास झाली आहे. घटनास्थळाची तसेच साक्षीदार यांची फोटो व व्हिडिओ ग्राफी घटनास्थळी केल्याने मा. न्यायालयात पोलीसांनी सादर केलेले पुराव्याची विश्वासार्थ वाढून गुन्हेगाराना कठोर शिक्षा होण्यास मदत झाली आहे.
- **एक गाव एक अंमलदार** अंतर्गत पोलीस ठाणे नेमणूकीस असलेल्या एका अंमलदारास एक गाव प्रदान करण्यात येते. प्रदान केलेल्या गावात अंमलदार आठवडयातून दोन वेळा भेट देवून गावातील कायदा व सुव्यवस्था व गुन्हयांची माहिती घेत असतात. गाव प्रदान केलेल्या अंमलदार पालका प्रमाणे गावातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे, समन्स, अर्ज चौकशी स्वत: करतात. गावातील असुरक्षित घटकातील नागरिकांकडे पोलीस अंमलदार विशेष लक्ष देवून त्याच्या हक्काची पायमल्ली होणार नाही याची दक्षता घेत आहेत.
- औरगांबाद परिक्षेत्रामध्ये नेल्सन व्यवस्था अंतर्गत एक तपासी अधिकारी भाग १ ते ५ मधील गुन्हयाचा तसेच भाग ६ मधील अपमृत्यु प्रकरणाचा तपास करतात. औरंगाबाद परिक्षेत्रामधील ४०० निशस्त्र पोलीस नाईक पदावरील अंमलदार यांना डीटीएस नाशिक येथे तपासी अधिकारी यांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या नवीन तपासी अधिकारी यांना वरिष्ठ अधिकारी यांच्या देखरेखेखाली छोटया गुन्हयाचा तपास दिला जातो. नवीन तपासी अधिकारी यांना दिलेल्या गुन्हयाचा तपास ६० ते ९० दिवसात पूर्ण करुन याबाबत योग्य कारवाई करावी. याकरिता त्यास ई बाईकची मदत दिली जाते.

# ११. गडचिरोली जिल्हा पोलीस

**योजनेचा उद्देश:** पोलीसांची कार्यक्षमता वाढवून जनतेला सुयोग्य सेवा पुरविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम**:

गडचिरोली परीक्षेत्रातील पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- गडचिरोली हा नक्षलग्रस्त विभाग असून तेथील अधिकारी व अंमलदार याची शारिरीक क्षमता वाढविण्यासाठी व नियमितपणे निरनिराळया प्रकारची विशेष प्रशिक्षणे देण्यात येतात. उदा. बॉम्ब शोधक व नाशक, जंगल गस्त, गस्त कोर्स, जीपीएस प्रणाली हाताळणे इत्यादी. यामुळे अधिकारी व अंमलदारांची नक्षलग्रस्त भागात काम करण्याची कार्यक्षमता व मनोधैर्य उंचावून नक्षलवादी हल्यात शहीद होण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
- शासकीय सुधारणा प्रकल्प दुर्गम भागातील जनतेपर्यत पोहचण्याकरिता पोलीस ठाणे व इतर सरकारी कार्यालयाचे समन्वयाने जनजागृती करण्यात आल्याने मुळ आदिवासींपर्यत सरकारी योजना पोहचण्यात व त्यांची यशस्वीरित्या अंमलबजावणी होणे सुकर झाले आहे.
- पोलीसांनी वैदयकीय विभागाच्या समन्वयाने आयोजित केलेल्या मोफत वैदयकीय तपासणी शिबीरामुळे आदिवासीना चांगल्या आरोग्य सुविधा मिळून त्याच्या जिवीतास औषधोपचारा अभावी होणारा धोका कमी झाला आहे.
- नक्षलवादी क्रुर कारवायांचे सामाजिक व वैयक्तीक दुष्परिणाम निरनिराळया माध्यमांतून जनतेसमोर आणल्याने आदिवासी जनतेमध्ये नक्षलवाद्यांबाबत सहानभुती कमी होवून त्याच्या हालचालीची माहिती पोलीसांना मिळण्यास मदत झाली आहे.

## १२. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस

**योजनेचा उद्देश:** पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला चांगल्या प्रकारची सेवा पुरविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- महिलाकडून दाखल होत असलेल्या गुन्हयासाठी पोलीस ठाणे पातळीवर एक महिला समिती व विशेष पथक स्थापन करुन त्याच्या तक्रारीचा तपास विशेष तपास पथका मार्फत केला जातो. गुन्हयाचा तपास तात्काळ झाल्याने तक्रारदारांचा विश्वास वाढला असून गुन्हेगारांना देखील समज मिळाली आहे. कमिटीने विविध विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्याने पोलीस व नागरिक यांच्या मध्ये सुसंवाद व समन्वय वाढला आहे.
- उच्च तंत्रज्ञान असलेले सुसज्ज नियंत्रण कक्ष स्थापन झाल्याने दुरच्या नागरिकांना त्यांच्या तक्रारी व अपत्कालीन वेळी पोलीसांशी तात्काळ संपर्क साधता येतो.
- संवेदनाशील व अपघातग्रस्त ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याने बहुताश: परिसर पोलीसांच्या निगराणी खाली येवून वाहतुक संबंधी तसेच इतर प्रकारचे गुन्हयास आळा बसून गुन्हे उघडकीस येण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.
- RFID (Radio Frequency Identification) प्रणाली गस्तीवरील गाडयांवर बसविल्याने गाडयांचे निश्चित ठिकाण कळून नागरिकांना जवळच्या गस्ती वाहनाची तात्काळ मदत देण्यास मदत झाली आहे.
- जिल्हा नियंत्रण कक्ष येथे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या तक्रारीकरिता कक्षाची स्थापना झाली असून पोलीस अधिकारी व कर्मचारी याच्या तक्रारी व अडचणी समजवून घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

## १३. यवतमाळ जिल्हा पोलीस

**योजनेचा उद्देश:** नागरिकांच्या तक्रारीसाठी चांगल्या प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन त्याच्या तक्रारीस न्याय देणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

यवतमाळ जिल्हा पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- दूरक्षेत्रामध्ये राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या तक्रारीसाठी शहरात येवून हेलपाटे घालण्यास लागू नये या उददेशाने ई तक्रार केंद्र सुरु केल्याने पोलीस स्टेशन पासून दूर अंतरावर ग्रामिण भागात राहणाऱ्या नागरीकांना आपल्या तक्रारी सहजपणे नोंदवता येऊ लागल्या.
- नागरीकांच्या त्यांच्या तक्रारींची पोलीसांनी तत्काळ व योग्य दखल घेऊन कायदेशिर कार्यवाही केल्यामुळे इतर नागरिकही तक्रार देण्यास पुढे येवू लागले आहेत यामुळे भयमुक्त वातावरण निर्माण होण्यास मदत झाली आहे.
- नागरिकांना त्याच्या तक्रारीची प्रगती व निर्गती कळविण्याने पोलीस ठाण्यातील त्याचे हेलपाटे वाचून त्याच्या पैसे व वेळेची बचल झाली आहे.
- प्रथम खबरी अहवाल व गुन्हयांतील अटक आरोपींची माहिती सिटीझन पोर्टलवर प्रकाशित केल्याने सामान्य नागरिकांना त्याच्या केसेसची सद्यस्थितीची माहिती उपलब्ध करुन दिल्याने जनतेच्या मनात पोलीसांबाबत विश्वासाची भावना निर्माण झाली आहे.

# १४. भंडारा जिल्हा पोलीस

**योजनेचा उद्देश:** नागरिकांच्या तक्रारीसाठी चांगल्या प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन त्याच्या तक्रारीस न्याय देणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- दि. २६/०१/२०१७ रोजी भारताच्या ६८ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन नाविन्यपुर्ण संकल्पनेतुन दुरक्षेत्रामध्ये राहणाऱ्या नागरीकांच्या तक्रारीसाठी भंडारा पोलीस आप के साथ भी आप के पास भी फिरते या संकल्पनेतून पोलीस ठाणे हि प्रणाली भंडारा जिल्हयांत राबविण्या येवून भंडारा पोलीस ठाणे येथे प्रायोजिक तत्त्वावर पहिले फिरते पोलीस ठाणे कॅम्प घेण्यात आला.
- फिरते पोलीस ठाणे अंतर्गत एका गावाची निवड करुन त्या गावचे सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष व बीट अंमलदार यांना वरिष्ठ अधिकारी मार्गदर्शन करुन फिरते पोलीस स्टेशन संदर्भात लोकांना माहिती देण्यात येते. उपरोक्त प्रतिनिधी समक्ष नागरिकांच्या तक्रारी/समस्या यांची नोंद करुन तक्रीचे निवारण त्याच वेळी करण्यात येते त्यामुळे नागरिकांच्या तक्रारीचे निरसन होवू लागले आहे.
- तक्रारीची प्रगती व निर्गती तक्रारदार याना कळविल्याने पोलीस ठाण्यातील त्याचे हेलपाटे वाचून त्याच्या पैसे व वेळेची बचत झाली आहे. वरील उपक्रमात १७ पोलीस स्टेशनमध्ये ९०८ फिरते पोलीस ठाणे कॅम्प आयोजित करण्यात आले. त्यामध्ये २२० तक्रारी प्राप्त झाल्या व त्या सर्व तक्रारीचा तेथेच निपटारा करण्यात आला.
- फिरते पोलीस ठाणे मध्ये कायदा, स्त्री अत्याचार व सुरक्षेबाबत मार्गदर्शन व जनजागृती केली गेली यामुळे नागरिकांमध्ये कायदयाविषयी जागरुकता व महिलामध्ये स्वत:च्या सुरक्षेबाबत जागरुकता आली आहे.
- गावातील दिवानी महसुली, फौजदारी व इतर जुने वाद वेळीच सामजस्याने सोडविले गेल्याने पुढे त्याचे कायदा व सुव्यवस्थेमध्ये रुपांतर होण्याचे टळले आहे.
- गाव विकास प्रक्रियेत अडसर ठरलेल्या तक्रारी सोडवून गावच्या विकासाचा मार्ग सुकर झाला आहे. फिरते पोलीस ठाणे ही संकल्पना न राहता लोकचळवळ बनली आहे.

## १५. जळगांव जिल्हा पोलीस

**योजनेचा उद्देश:** पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला सेवा पुरविणे.

**योजनेची अंमलबजावणी व परिणाम:**

जळगांव जिल्हा पोलीसांची कार्यक्षमता वाढवुन जनतेला जलद व सुयोग्य सेवा पोहचविण्यासाठी खालील प्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- **RFID** प्रणालीमुळे जळगाव जिल्हयातील ११ पोलीस ठाण्यातील गस्त करणा-या गाडयांचे निश्चित ठिकाण कळून नागरिकांना जवळच्या गस्ती वाहनाची तात्काळ मदत उपलब्ध होवून गस्तीवरील गाडयावर देखरेख करणे सोपे व सुकर झाले आहे.
- **VMS-** प्रणालीव्दारे अभ्यागाताच्या तक्रारीची अथवा भेटीची विस्तृत नोंद विनापेपर घेवून त्यास सद्यस्थितीची माहिती दिल्याने पोलीस व नागरिक यांच्यातील समन्वय वाढला आहे.
- सायबर क्राईम, वाहतुक सुरक्षा, रस्ते सुरक्षा, सुट्टीकालिन सुरक्षा, मालमत्तेच्या गुन्हयाबाबत घ्यावयाची काळजी, महिलाबाबतचे गुन्हयाबाबत जनजागृती करण्यासाठी मिडीया व्हॅनचा उपयोग करण्यात आल्याने जनमानसात सुरक्षेबाबत जागृती होवून सतर्कता वाढली आहे.
- **M-PASS PORT APP** या अॅप व्दारे पासपोर्ट पडताळणी प्रक्रीया जलद गतीने होवून नागरिकाचा पासपोर्ट मिळविण्याकरिता लागणा-या वेळेत बचत झाली आहे. ऑनलाईन तक्रारीकरिता सोशल मिडीया कक्ष स्थापन करुन व्हॉटसअॅप, फेसबुक, टीवटर, प्रतिसाद अॅप, वाहन चोरी पोर्टल द्वारे जनतेमध्ये जनजागृती करुन गुन्हयांना प्रतिबंध, जेष्ठ नागरिक व महिलांना मदत देण्यासाठी होत आहे.
- महिलांच्या सुरक्षितेसाठी निर्भया पथकांची स्थापना केली असून पथकाच्या शाळा, कॉलेज, गार्डन व सार्वजनिक ठिकाणी सततच्या गस्तीमुळे महिलाबाबत होणाया गुन्हयास प्रतिबंध बसून महिलामध्ये सुरक्षेतेबाबत जागरुकता निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.
- सायबर गुन्हे जागरुकतता अंतर्गत सायबर सुरक्षा व सायबर गुन्हेगारीस प्रतिबंध कसा करावा याबाबत माहिती देण्यात येते. एकुण २३ शाळा, खाजगी संस्था, कॉलेज मध्ये सायबर सुरक्षा कार्यक्रम राबविण्यात आला त्याचा चांगला परिणाम दिसून आला आहे.
- विद्यार्थी व नागरिकाकरिता वाहतुक सुरक्षा व रस्ते सुरक्षा योजना राबविल्याने वाहन चालकाच्या बेजबाबदारपणास थोडया प्रमाणात आळा बसला आहे.

जनतेमध्ये मैत्रीपूर्वक संबध ठेवल्याने उत्सव, स्थानिक कार्यक्रमाच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यास पोलीस मित्राची अतिरिक्त मदत उपलब्द झाली आहे.